जा.क्र./मरापप/जीसीसी/प्रशा/२०२२/३५९०
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे-०१
दिनांक :- १८/०७/२०२२.

प्रति,

**संस्थाचालक / प्राचार्य**
**शासनमान्य संगणक टायपिंग संस्था,**
**महाराष्ट्र व गोवा राज्य.**

**विषय :- शासकीय संगणक टायपिंग प्रमाणपत्र परीक्षा (GCC-TBC) व स्पेशल स्किल इन कॉम्प्युटर टायपिंग फॉर इन्स्ट्रक्टर्स अ‍ॅण्ड स्टुडन्टस् (GCC-SSD-CTC) जुलै-२०२२ ते ऑगस्ट -२०२२ परीक्षा बॅच बदलाबाबत.**

**संदर्भ :-** या कार्यालयाची अधिसूचना दि.०२/०५/२०२२.

उपरोक्त विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे मार्फत (GCC-TBC) इंग्रजी ३० व ४० श.प्र.मि. विषयाची परीक्षा दि. २५/०७/२०२२ ते ०२/०८/२०२२ या कालावधीत तसेच मराठी / हिंदी ३० व ४० श.प्र.मि. विषयाची परीक्षा दि. १०/०८/२०२२ ते १९/०८/२०२२ या कालावधीत तर (GCC-SSD-CTC) स्पेशल स्किल इन कॉम्प्युटर टायपिंग फॉर इन्स्ट्रक्टर्स अ‍ॅण्ड स्टुडन्टस् ही परीक्षा दि. २३/०८/२०२२ रोजी एक दिवस ऑनलाईन पद्धतीने घेण्याचे निश्चित करण्यात आले आहे.

सदर परीक्षेसाठी खाली नमूद केलेल्या कारणास्तव बॅच बदल देण्यात येईल इतर कोणत्याही करणाने बॅच बदल दिला जाणार नाही. प्रवेशपत्र (हॉल तिकीट) मिळालेनंतर तीन दिवसांचे आत बॅच बदल साठी ई-मेल द्वारे अर्ज करुन बॅच बदलाची प्रक्रीया पूर्ण करावी, सदर दिलेल्या कालावधीत बॅच बदल न केल्यास बॅच बदल दिला जाणार नाही. याची सर्व संस्थाचालक / प्राचार्य यांनी नोंद घ्यावी.

बॅच बदल केवळ पुढील बाबतीतच मान्य केला जाईल याबाबत अंतिम अधिकार परीक्षा परिषदेस असतील.

१. विद्यापीठ परीक्षा
२. स्पर्धा परीक्षा
३. परीक्षा केंद्रावरील तांत्रिक कारण
४. आकस्मिक दुर्घटना

याबाबतची मागणी परीक्षा परिषदेचा mscegcctbc@gmail.com या ई-मेलद्वारे आवश्यक पुराव्यासह करता येईल. बदल मान्य झाल्यास संबंधित परीक्षा केंद्रसंचालक / केंद्रसमन्वय आणि संबंधित उमेदवारांना ई-मेलद्वारे कळविले जाईल. ज्या ई-मेल द्वारे बॅच बदलाचा प्रस्ताव परिषदेस प्राप्त होईल. त्याच ई-मेल आयडीवर बॅच बदल मान्य / अमान्य बाबत कळविले जाईल.

(सही) १८/७/२०२२
**(शैलजा दराडे)**
**आयुक्त,**
**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,**
**पुणे -१.**

JULY-2022/IMP Letter